सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२३४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १५ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## राज्यात निवडणुका जाहीर, २० नोव्हेंबरला मतदान, २३ नोव्हेंबरला निकाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १५ मुंबई**

महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम अखेर जाहीर करण्यात आला आहे. राज्यात विधानसभेसाठी एकाच टप्प्यात मतदान होणार असून २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे, तर २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या उपस्थितीत आज झालेल्या पत्रकार परिषदेत याबाबतची माहिती देण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणूक तारखांची घोषणा केल्याने आजपासून राज्यात आदर्श



आचारसंहिताही लागू झाली आहे.

निवडणूक कार्यक्रमाविषयी माहिती देताना राजीव कुमार म्हणाले की, महाराष्ट्र विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस २९ ऑक्टोबर हा असेल, तर ३० ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येणार आहे. उमेदवारांना ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत असणार आहे.

**राजीव कुमार यांच्या पत्रकार परिषदेतील ठळक मुद्दे:**

महाराष्ट्रात एकूण ९.६३ कोटी मतदार असून राज्यात विधानसभेच्या एकूण २८८ जागा आहेत. यामध्ये २३४ सर्वसाधारण मतदारसंघ असून २५ मतदारसंघ अनुसूचित जमातींसाठी तर २९ मतदारसंघ अनुसूचित जातींसाठी राखीव आहेत.

मतदार हेल्पलाइनच्या आधारे मतदार आपल्या मतदान केंद्रासह इतर माहिती मिळवू शकतात.

मतदान केंद्रांवर मतदारसंघांसाठी पाण्यासह विविध सुविधा उपलब्ध केल्या जातील.



निवडणूक काळात पैशांचा गैरवापर होऊ नये, यासाठी विविध ठिकाणी पथकाद्वारे तपासणी केली जाईल.

ज्या उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे, त्यांना आपल्याबाबत तीनदा वृत्तपत्रांतून माहिती द्यावी लागेल.

दरम्यान, राज्यातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन प्रमुख प्रादेशिक पक्षांमध्ये पडलेल्या फुटीनंतर होत असलेली ही पहिलीच विधानसभा निवडणूक आहे. तसंच महायुती आणि महाविकास आघाडी या नावांनीतयारी झालेल्या नव्या राजकीय समीकरणांचाही या निवडणुकीत कस लागणार आहे. त्यामुळे यंदाची विधानसभा निवडणूक चांगलीच रंगतदार ठरणार असून यामध्ये कोण बाजी मारणार, याबाबत देशभरात उत्सुकता आहे.

**निवडणूक जाहीर होताच राज्यात आचारसंहिता लागू**

महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही आघाड्यांसाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणुकीची तारीख जाहीर करण्यासोबत आजपासून राज्यात आदर्श आचारसंहिता लागू होणार असल्याचीही घोषणा केली.

निवडणूक आयोगाला २६ नोव्हेंबर २०२४ पूर्वी निवडणुका घेणं बंधनकारक आहे. त्यामुळे त्यापूर्वी म्हणजेच २० नोव्हेंबरला मतदान पर पडेल. तर २३ नोव्हेंबरला मराहाष्ट्रातील जनता महायुतीला निवडते की महाविकास आघाडीला याचा निकाल लागेल.

**महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये कांटे की टक्कर**

शिवसेना आणि राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतरची ही पहिलीच विधानसभेची निवडणूक आहे. त्यामुळे, सर्वच पक्षांसाठी ही निवडणूक महत्त्वाची ठरणार आहे. या निवडणूक निकालावर अनेक गोष्टी अवलंबून आहेत. ठाकरेंची साथ सोडून शिंदेंनी शिवसेना मिळवली, तर अजित पवारांनी राष्ट्रवादी आपल्या ताब्यात घेतला. त्यामुळे आता या दोन्ही पक्षांना जनता किती साथ देते पाहावं लागेल. तर, दुसरीकडे, शरद पवार आणि उद्धव ठाकरेंची जादू लोकसभेप्रमाणे पुन्हा कमाल करणार का, याकडे सध्या सर्वांचं लक्ष लागलेलं आहे.

सध्या दोन्ही आघाड्यांमध्ये जागावाटपावरुन मोठी रस्सीखेच होत असल्याचं पाहायला मिळत आहे. सर्वच पक्ष श्रेष्ठींकडे इच्छुकांची रांग लागलेली पाहायला मिळत आहे. तर अनेक ठिकाणी नेत्यांचं या पक्षातून त्या पक्षात, त्या पक्षातून या पक्षात असं सुरु आहे.

## महाराष्ट्रातील राज्यपाल नियुक्त आमदारांचा शपथविधी, चित्रा वाघ, मनीषा कांयदेंनी घेतली शपथ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १५ मुंबई**

गेल्या पाच वर्षांपासून रखडलेल्या राज्यपाल नियुक्त विधानपरिषद आमदारकीला अखेर आज मुहुर्त मिळाला आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून राज्यपाल नियुक्त विधानपरिषद आमदारकीसाठी १२ आमदारांची नियुक्ती रखडली होती. अखेर आज राज्यपाल नियुक्ती आमदारकीसाठी १२ पैकी ७ नेत्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आज महाराष्ट्रातील राज्यपाल नियुक्त आमदारांचा शपथविधी सोहळा पार पडला. दुपारी १२ वाजता विधानभवनातील सेंट्रल हॉलमध्ये हा सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे या विधानपरिषद सदस्यांना शपथ दिली.

महाराष्ट्राच्या राज्यपाल नियुक्त आमदारांच्या शपथविधीसाठी विधीमंडळात जोरदार तयारी करण्यात आली होती. उपसभापती निलम गोरे यांच्या उपस्थितीत हा शपथविधी पार पडला. राज्यतील विधानसभा निवडणुकांची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी महायुती मोठी खेळी करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरकारकडून राज्यपाल नियुक्त आमदारांची यादी तयार करण्यात आली होती. या आमदारांच्या नावांची यादी सोमवारी राज्यपालांकडे पाठवण्यात आली होती. त्यानंतर रात्री उशिरा राज्यपालांनी या नावांना मंजुरी दिली आहे.

### महायुतीचा फॉर्म्युलाही निश्चित


राज्य सरकारकडून राज्यपाल नियुक्त १२ जागांपैकी ७ जागांसाठी उमेदवारांची नावे राज्यपालांकडे पाठवण्यात आली होती. राज्यपाल नियुक्त ७ आमदारांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यापूर्वी महायुतीचा फॉर्म्युलाही निश्चित करण्यात आला होता. यानुसार भाजप ३, शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाला प्रत्येकी २-२ जागा असा फॉर्म्युला निश्चित करण्यात आला आहे. राज्यपाल नियुक्त सात आमदारांमध्ये भाजपकडून चित्रा वाघ, विक्रम पाटील, धर्मगुरु महाराज राठोड या तिघांना संधी देण्यात आली आहे. तर शिवसेनेकडून माजी खासदार हेमंत पाटील आणि मनीषा कायंदे आणि राष्ट्रवादीकडून इंद्रीस नायकवाडी, पंकज भुजबळ यांना राज्यपाल कोट्यातून आमदारकीची संधी देण्यात आली आहे. नुकताच या सात जणांनी आमदारकीची शपथ घेतली.

## निवडणुकीपूर्वी मोफत दिल्या जाणाऱ्या योजना म्हणजे लाच; सुप्रीम कोर्टाची सरकारला नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १५ नवी दिल्ली**

निवडणूक आयोग आज महाराष्ट्र आणि झारखंडच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर करणार आहे. यापूर्वी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. त्याआधी सुप्रीम कोर्टाने एका याचिकेवर केंद्र आणि निवडणूक आयोगाला नोटीस बजावली आहे. राजकीय पक्षांनी निवडणुकीपूर्वी दिलेल्या मोफत गोष्टींचे आश्वासन लाच म्हणून घोषित करण्याचे आदेश देणारी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. सुप्रीम कोर्टाने ही याचिका आधीच्या प्रलंबित प्रकरणांसोबत जोडली आहे. निवडणुकीपूर्वी राजकीय पक्षांनी दिलेल्या मोफत सुविधांवर तात्काळ बंदी घालण्यात यावी, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना भारताचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने केंद्र आणि निवडणूक आयोगाला नोटीस बजावली आहे.

महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या आधी दोन्ही राज्यातील सत्ताधारी पक्षांनी जनतेसाठी अनेक लोकोपयोगी योजना जाहीर केल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये महिलांसाठी दरमहा १५०० रुपयांपर्यंतची रोख लाडकी बहीण योजना जाहीर करण्यात आली आहे. तर टोल टॅक्समध्ये सूट देण्यासारखे निर्णयही घेण्यात



आले आहेत. अशा निर्णयांना आव्हान देणारी याचिका सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर मंगळवारी सुनावणी करताना सुप्रीम कोर्टाने केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाला नोटीस बजावली.

निवडणुकीपूर्वी मोफत योजनांची घोषणा लाच म्हणून जाहीर करावी, अशी मागणी या याचिकेत कोर्टाकडे करण्यात आली होती. हा एक प्रकारे मतदारांना लाच देण्याचा प्रकार आहे, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणं होतं. या अर्जावर सुप्रीम कोर्टाने केंद्र आणि निवडणूक आयोगाला नोटीस बजावून त्यांची प्रतिक्रिया मागवली आहे. याशिवाय दाखल केलेल्या याचिकांना आधीच प्रलंबित याचिकांसोबत जोडण्यात आले आहे. निवडणुकीपूर्वी काही काळ मोफत योजनांच्या घोषणेवर बंदी घालावी, अशी मागणीही याचिकाकर्त्याने केली होती. अशी बंदी केवळ सरकारलाच नाही तर सर्वच राजकीय पक्षांना लागू झाली पाहिजे, असेही याचिकाकर्त्याचे म्हणणं आहे.

मोफत सुविधांच्या मुद्द्यावर सुप्रीम कोर्टात अनेक याचिका दाखल झाल्या आहेत. याप्रकरणी दोन मुख्य याचिका आहेत. कर्नाटकातील शशांक जे श्रीधर यांनी ही नवी याचिका दाखल केली आहे. २०२२ मध्ये भाजप नेते अश्विनी उपाध्याय यांनी या विरोधात जनहित याचिका घेऊन सुप्रीम कोर्टात पोहोचले होते. याचिकाकर्ते शशांक जे श्रीधर यांचे वकील बालाजी श्रीनिवासन यांनी सोमवारी सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या खंडपीठासमोर हे प्रकरण मांडले होते. विधानसभा किंवा सार्वत्रिक निवडणुकांदरम्यान मोफत योजनांचे आश्वासन देणाऱ्या राजकीय पक्षांनी लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ अंतर्गत लाचखोरी किंवा मतांसाठी प्रलोभन मानले पाहिजे.

## राष्ट्रसंताचा पुण्यतिथी महोत्सव ला आजपासून सुरुवात : मौन श्रद्धांजली २१ ऑक्टोबर रोजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १५ अमरावती**

संपूर्ण विश्वाला मानवतेचा संदेश देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५६ व्या पुण्यतिथी महोत्सवाला आज पासून गुरुकुंज आश्रमात प्रारंभ झाला. अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम यांनी या महोत्सवाचे जय्यत तयारी केली आहे



सात दिवसीय महोत्सवात दररोज सामुदायिक ध्यान सामुदायिक प्रार्थना, चिंतन ग्रामसफाई,प्रवचन,कीर्तन, संमेलन भजन संध्या, खंजरी भजन, योगासन शिबिर,वक्तृत्व स्पर्धा, ग्रामगीताचार्य पदवी प्रदान समारंभ, कार्यकर्ता संमेलन महिला मेळावा, अभंग गायन होईल.

सामुदायिक प्रार्थना विश्वशांतीचा महामंत्र या विषयावरील परिसंवादात विदेशी भावीक सहभागी होणार आहे. मौन श्रद्धांजली २१ ऑक्टोबर रोजी वाहिली जाईल.आज पहाटे चार वाजता तीर्थ स्थापना चरणपादुका व महासमाधी पूजनाने या महोत्सवाची सुरुवात झालेली आहेत. सकाळी सामुदायिक झाल्यानंतर गुरुकुंज आश्रमात राष्ट्रसंताच्या प्रतिमेची शोभायात्रा काढण्यात आली. यात विविध भजनी मंडळ सहभागी झाले होते

## काँग्रेसकडून भाजपाला धक्का, दोन माजी आमदारांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १५ मुंबई**

विधानसभा निवडणूक तोंडावर आली असताना केंद्रात आणि राज्यात सत्तेवर असलेल्या भाजपामधून मोठ्या प्रमाणावर आऊटगोईंग सुरू झालं आहे, तर काँग्रेस पक्षात प्रवेश घेणाऱ्यांची संख्या दररोज वाढत आहे. दरम्यान, सोमवारी भाजपाच्या दोन माजी आमदारांना पक्षात घेत काँग्रेसने भाजपाला मोठा धक्का दिला आहे. सोमवारी टिळक भवनमध्ये प्रभारी रमेश



चेन्नीथला व प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार व बुलढाणा जिल्ह्याचे माजी अध्यक्ष धृपदराव सावळे आणि नांदेड जिल्ह्यातील मुखेड देगलूर मतदार संघाचे भाजपाचे माजी आमदार अविनाश घाटे यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

भाजपाचे माजी आमदार असलेले धृपदराव साळवे आणि अविनाश घाटे यांच्यासह मनसेचे राज्य उपाध्यक्ष विठ्ठल लोखंडकार, राज्य ग्राहक सल्लागार समितीचे माजी अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे कमाल फारुखी, प्रवक्ते उमर फारुखी, अकोला जिल्ह्यातील वंचितचे डॉ. रहेमान खान, बाळापूरचे माजी नगराध्यक्ष जम्मूसेठ यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

यावेळी नाना पटोले म्हणाले की, राज्यातील भाजपा शिंदे सरकारच्या भ्रष्ट कारभाराला जनता कंटाळली आहे. महागाई, बेरोजगारी प्रचंड वाढली असून शेतकरी, कामगार यांचे प्रचंड हाल होत आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत, महागाईने जगणे कठीण झाले आहे परंतु राज्यातील युती सरकार जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष देत नाही. काँग्रेस पक्षाची विचारधाराच देशाला तारणारी असून राहुल गांधी यांची देश जोडणारी भूमिका सर्वात महत्वाची आहे. लोकसभा निवडणुकी प्रमाणेच विधानसभा निवडणुकीतही राज्यात काँग्रेस पक्षच सर्वात मोठा पक्ष म्हणून विजयी होईल असा विश्वास व्यक्त करून काँग्रेसची विचारधारा तळागाळात पोहचवा असे आवाहन नाना पटोले यांनी यावेळी केली.

## सात आमदारांच्या नियुक्तीवरून रोहित पवारांचा शिंदे सरकारवर हल्लाबोल



**विदर्भ प्रजासत्ताक दि. १५ मुंबई**

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील विधानसभा निवडणूक केव्हा जाहीर होणार याची सर्वच राजकीय पक्षांना उत्सुकता लागली होती. अखेर आज विधानसभा निवडणुकीची तारीख जाहीर होणार आहे. निवडणूक आयोग आज दुपारी ३.३० वाजता पत्रकार परिषद घेणार असून यावेळी महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभेचा निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार असल्याचे निवडणूक आयोगाकडून सांगण्यात आलं आहे. निवडणूक आयोगाने निवडणुकीची तारीख जाहीर करताच यावर विविध राजकीय प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे. तसेच बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर राज्यातील राजकीय वातावरण तापलं आहे. याप्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. तर इतर आरोपींचा शोध शुरू आहे. महत्त्वाचे म्हणजे बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर अभिनेता सलमान खान याच्या सुरक्षेतही वाढ करण्यात आली आहे. याशिवाय राज्यातील इतरही घडामोडींकडे आपलं लक्ष असणार आहे. विधान परिषदेवरील राज्यपाल नियुक्त आमदारांच्या बारा जागांवर सात जणांच्या नावांची शिफारस राज्यपाल सी. पी. राधाकृष्णान यांच्याकडे करण्यात आली आहे. यात भाजपचे तीन, तर शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या प्रत्येकी दोन नावांचा समावेश आहे. राज्यपालांनी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या नियुक्त्या करणे अपेक्षित असताना राजकीय नेत्यांचीच वर्णी लावली जात असल्याचे यामुळे स्पष्ट झाले आहे.

## संपादकीय ......

# ट्रुडो यांचा ढोंगीपणा पुन्हा-पुन्हा जगापुढे

जगातील काही भाग संघर्षभूमी बनलेला असतानाच, भारत-आसियान मैत्री अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. २१ वे शतक आशियाचे शतक असून, त्यात भारताचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे, असे सार्थ प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाओसमधील व्हिएंटियान येथे भारत-आसियानच्या २१ व्या शिखर परिषदेला संबोधित करताना केले. १९६७ मध्ये साम्यवादाच्या प्रसाराविरुद्ध सामायिक आघाडी निर्माण करण्याच्या हेतूने 'आसियान' संघटनेची स्थापना झाली. आग्नेय आशियामधील १० स्वतंत्र देशांची ही एक आर्थिक संघटना म्हणून निर्माण झाली. शीतयुद्ध काळात आसियान देश अमेरिकेच्या बाजूचे होते. भारत तटस्थतेचा पुरस्कार करत असला, तरी परराष्ट्र धोरणात सोव्हिएत रशियाच्या बाजूने झुकते माप होते. रशिया, चीन व अमेरिकेप्रमाणे १९९६ मध्ये आसियानकडून भारताला सल्लागार सदस्यपद मिळाले. भारताने २००९ मध्ये आसियानशी व्यापारी करार केला. गेल्या दशकात आसियानशी भारताचा व्यापार दुप्पट झाला आहे; पण या संघटनेतील देशांबरोबरच्या व्यापारात भारतास ४४ अब्ज डॉलर इतकी तूट आली असून, याबद्दलची चिंताही मोदी यांनी व्यक्त केली आहे. यासाठी सदस्य देशांनी बाजारपेठाही अधिक खुल्या केल्या पाहिजेत. भारत, इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाईन्स, सिंगापूर, थायलंड, व्हिएतनाम, लाओस, कंबोडिया आणि ब्रुनेई हे आसियानचे सदस्य देश आहेत. शिवाय ऑस्ट्रेलिया, चीन, जपान, दक्षिण कोरिया, न्यूझीलंड, रशिया आणि अमेरिका हे आसियानचे 'भागीदार देश' आहेत. कॅनडा हा देश १९७७ पासून आसियानचा 'डायलॉग पार्टनर' असून, त्या देशाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांची लाओस येथे मोदी यांच्याशी भेट झाली.खलिस्तानवादी हरदीपसिंग निज्जरच्या हत्येमागे भारताचा हात असल्याचा आरोप ट्रुडो यांनी केल्यानंतर वर्षभरानंतर ही भेट झाली आहे. यावेळी उभयतांमध्ये कोणतीही ठोस चर्चा झाली नसली, तरी कॅनडाच्या नागरिकांची सुरक्षा आणि कायद्याचे संरक्षण ही माझी जबाबदारी असून, त्यावर मी लक्ष केंद्रित ठेवेन, असे ट्रुडो यांनी सांगितले आहे. कॅनडात राहून भारताच्या विरोधात कटकारस्थाने करण्यामुळे भारतीय असुरक्षित होत नाहीत का, हा प्रश्न काही ट्रुडो यांना पडला नसावा! निज्जर हत्येप्रकरणी ट्रुडो यांनी भारतावर बेछूट आरोप केल्यापासून दोन्ही देशांमधील संबंध बिघडले. भारताने ट्रुडोंचे आरोप स्पष्टपणे फेटाळले असले, तरी या प्रकरणावरून भारताला टोमणे मारण्यात ट्रुडो यांना आनंद मिळत असावा! एकेकाळी स्वतंत्र खलिस्तानच्या आपल्या मागणीकडे आंतरराष्ट्रीय समूहाचे लक्ष वेधण्याच्या उद्देशाने खलिस्तानवाद्यांनी २२ ऑगस्ट १९८२ रोजी इंडियन एअरलाईन्सच्या मुंबईहून दिल्लीला जाणार्या विमानाचे अपहरण केले होते; पण भारताने अमृतसर येथे कारवाई करून विमानातील ६९ प्रवाशांची सुखरूप सुटका केली. विमान अपहरणानंतर पाकिस्तान अभय देईल, या अपेक्षेने खलिस्तानवाद्यांनी हे विमान सरळ लाहोरकडे नेले; मात्र पाक सरकारने विमान लाहोर विमानतळावर उतरू न दिल्यामुळे ते परत अमृतसरला उतरवावे लागले होते.यानंतर खलिस्तानवादी चळवळीचे लंडनमधील स्वयंघोषित प्रमुख डॉ. जगजितसिंग चौहान आणि वॉशिंग्टन येथील नानकाना साहिब फाऊंडेशनचे गंगासिंग धिल्लाँ यांनी पाकिस्तान सरकारचा तीव्र निषेध केला; पण त्यानंतर पाकिस्तानने खलिस्तानवाद्यांना मदत करण्याचे धोरण स्वीकारले. अमेरिका व ब्रिटनप्रमाणेच कॅनडातही खलिस्तानी चळवळीची पाळेमुळे आहेत. खलिस्तानवाद्यांत तलविंदरसिंग परमार हे नाव मोठे असून, तो 'बब्बर खालसा' संघटनेचा प्रमुख होता. पंजाब पोलिसांबरोबर झालेल्या चकमकीत तो मारला गेला; पण १९८५ मध्ये कॅनडाच्या माँट्रियल विमानतळावरून एअर इंडियाच्या 'कनिष्क'चे लंडनच्या दिशेने उड्डाण झाले, त्याचा स्फोट होऊन ३२९ लोकांचा मृत्यू झाला होता. या कटाचा सूत्रधार परमारच होता. परमारने १९७८ मध्ये कॅनडात 'बब्बर खालसा इंटरनॅशनल' ही संघटना सुरू केली आणि पंजाबातील फुटीरतावादी खलिस्तान्यांना तो आर्थिक मदतही पुरवत असे.

कॅनडाला जाणार्यांमध्ये पंजाबमधील शिखांची संख्या मोठी आहे. शीख मतपेढीसाठीच कॅनडाच्या ट्रुडोंसारख्या राज्यकर्त्यांनी व त्यांच्या पूर्वसूरींनी खलिस्तानी चळवळीला प्रोत्साहन दिले. जून २०२३ मध्ये कॅनडातील व्हँकुव्हरजवळ फुटीरतावादी शीख नेता हरदीपसिंग निज्जर याची गोळ्या झाडून हत्या झाली. या प्रकरणी तीन भारतीयांना अटक झाली. यामागे भारत सरकारचा सहभाग असल्याचा आरोप ट्रुडो यांनी केला होता; पण भारताने हे आरोप फेटाळले. निज्जरने स्वतंत्र शीख राष्ट्राची मागणी केली होती. अर्थातच भारताने त्यास 'दहशतवादी' म्हणून घोषित केले होते. कॅनडाच्या गुप्तचर संस्थांनी निज्जरच्या जिवाला धोका असल्याचा इशारा दिला होता, असे त्याच्या समर्थकांचे म्हणणे आहे. खलिस्तानवाद्यांच्या कारवायांना पायबंद घालावा, अशी भारताची मागणी होतीच. गेल्या वर्षी ट्रुडो भारतात आले होते. त्यानंतर काहीच दिवसांत कॅनडाच्या संसदेत त्यांनी निज्जरसंबंधात भारत सरकारवर चिखलफेक केली होती. याचा निषेध म्हणून भारताने कॅनडाच्या भारतीय दूतावासातील दोन तृतीयांश कर्मचार्यांना हाकलून दिले होते. एकीकडे शांततावादाचा जयघोष करायचा आणि दुसरीकडे केवळ मतांसाठी दहशतवाद्यांना थारा द्यायचा, हा ट्रुडो यांचा ढोंगीपणा पुन्हा-पुन्हा जगापुढे येत आहे. त्यावर कूटनीती आणि कॅनडास्थित भारतीयांच्या पाठिंब्यानेच मात करता येऊ शकेल.

# भाजपाचे माजी आमदार धृपदराव सावळे व अविनाश घाटेंचा काँग्रेस पक्षात प्रवेश




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ मुंबई-** काँग्रेस पक्षात प्रवेश घेणाऱ्यांची संख्या दररोज वाढत असून आज टिळक भवनमध्ये प्रभारी रमेश चेन्नीथला व प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार व बुलढाणा जिल्ह्याचे माजी अध्यक्ष धृपदराव सावळे, मनसेचे राज्य उपाध्यक्ष विठ्ठल लोखंडकार, नांदेड जिल्ह्यातील मुखेड देगलूर मतदार संघाचे भाजपाचे माजी आमदार अविनाश घाटे, राज्य ग्राहक सल्लागार समितीचे माजी अध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसचे कमाल फारुखी, प्रवक्ते उमर फारुखी, अकोला जिल्ह्यातील वंचितचे डॉ. रहेमान खान, बाळापूरचे माजी नगराध्यक्ष जम्मूसेठ यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह काँग्रेस पक्षात प्रवेश केला. नाना पटोले यांनी सर्वांचे काँग्रेस कुटुंबात स्वागत करुन शुभेच्छा दिल्या.

राज्यातील भाजपा शिंदे सरकारच्या भ्रष्ट कारभाराला जनता कंटाळली आहे. महागाई, बेरोजगारी प्रचंड वाढली असून शेतकरी, कामगार यांचे प्रचंड हाल होत आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत, महागाईने जगणे कठीण झाले आहे परंतु राज्यातील युती सरकार जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष देत नाही. काँग्रेस पक्षाची विचारधाराच देशाला तारणारी असून राहुल गांधी यांची देश जोडणारी भूमिका सर्वात महत्वाची आहे. लोकसभा निवडणुकी प्रमाणेच विधानसभा निवडणुकीतही राज्यात काँग्रेस पक्षच सर्वात मोठा पक्ष म्हणून विजयी होईल असा विश्वास व्यक्त करून काँग्रेसची विचारधारा तळागाळात पोहचवा असे आवाहन नाना पटोले यांनी यावेळी केली.

या कार्यक्रमाला अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मुकुल वासनिक, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, चंद्रकांत हंडोरे, खा. प्रणिती शिंदे, मुझफ्फर हुसेन, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष वर्षा गायकवाड, राजीव गांधी पंचायत राज मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे यांच्यासह प्रमुख नेते उपस्थित होते.

# रब्बी सुर्यफुल लागवडीसाठी कोणत्या वाणांची निवड कराल

**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक**

रब्बी हंगामात कोरडवाहू क्षेत्रात करडईनंतर सूर्यफुल हे पिक तेलबिया पिक घेतले जाते. खरीप पिकाचा विचार केला तर रब्बी हंगामात जमिनीत साठवलेल्या ओलाव्यावर हे पिक घेतले जाते.

रब्बी हंगामात कोरडवाहू क्षेत्रात करडईनंतर सूर्यफुल हे पिक तेलबिया पिक घेतले जाते. खरीप पिकाचा विचार केला तर रब्बी हंगामात जमिनीत साठवलेल्या ओलाव्यावर हे पिक घेतले जाते.

त्यामुळे पिक वाढीच्या काळात पावसाचा खंड पडला म्हणून पिकाचे नुकसान झाले असे होत नाही. कारण जमिनीच्या प्रकानुसार जमिनीत किती ओल साठविलेली आहे आणि पिकाची गरज हे आपणास पिक पेरणीच्या वेळी माहित असते.

म्हणून खरीपापेक्षा रब्बी हंगामात हमखास उत्पादन मिळण्याची शाश्वती असते. तसेच उत्पादनही चांगले मिळते. यावर्षी पाऊसमान चांगले आहे तरी सूर्यफुलाची लागवड करण्यास वाव आहे.

**सूर्यफूलाचे सुधारित वाण**

**१) भानू**

कालावधी (दिवस) : ८०-८५

उत्पादन (क्विं/हे.) : १२-१४

**वैशिष्ट्ये** : सर्व हंगामात पेरणीस योग्य, अवर्षण प्रवण विभागासाठी योग्य.

**२)फुले भास्कर**

कालावधी (दिवस) : ८२-८७

उत्पादन (क्विं/हे.) : १४-१५

**वैशिष्ट्ये** : पानावरील ठिपके रोगास सहनशील, अवर्षण प्रवण विभागासाठी योग्य. अधिक तेलाचे प्रमाण ३६%

**३) एल.एस.एफ.-८**

कालावधी (दिवस) : ९०-९५

उत्पादन (क्विं/हे.) : १०-१४

वैशिष्ट्ये : पानावरील ठिपके रोगास सहनशील.

**४) टी.ए.एस, ८२**

कालावधी (दिवस) : ९०-९५

उत्पादन (क्विं/हे.) : १०-१२

**वैशिष्ट्ये** : तेलाचे प्रमाण अधिक, महाराष्ट्रात लागवडीसाठी.




**५) डी.आर.एस.एफ. १०८-** कालावधी (दिवस) : ९०-९२

उत्पादन (क्विं/हे.) : १४-१६

वैशिष्ट्ये : अखिल भारतीय स्तरावर लागवडीसाठी, तेलाचे प्रमाण ३६%

**६) डी.आर.एस.एफ. ११३-** कालावधी (दिवस) : ९०-९५

उत्पादन (क्विं/हे.) : १४-१६

**वैशिष्ट्ये** : अखिल भारतीय स्तरावर लागवडीसाठी, तेलाचे प्रमाण ३७%

**सूर्यफूलाचे संकरीत वाण**

१) एल.एस.एफ.एच.-३५ (मारुती)

**कालावधी (दिवस)** : ९०-९५

उत्पादन (क्विं/हे.) : १६-१९ (बागायती)

वैशिष्ट्ये : अधिक उत्पादन, महाराष्ट्रात लागवडीसाठी, केवडा रोगास प्रतिकारक.

**२) एस, सी.एच. - ३५**

कालावधी (दिवस) : ९०-९५

उत्पादन (क्विं/हे.) : १२-१६

**वैशिष्ट्ये** : महाराष्ट्रात लागवडीसाठी, केवडा रोगास प्रतिकारक, तेलाचे प्रमाण अधिक.

**३) डी.आर.एस.एच-१**

**कालावधी (दिवस)** : ९२-९८

उत्पादन (क्विं/हे.) : १३-१६

**वैशिष्ट्ये** : अखिल भारतीय स्तरावर लागवडीसाठी, तेलाचे प्रमाण-४०%

**४) एल.एस.एफ.एच.-१७१**

कालावधी (दिवस) : ९०-९५

उत्पादन (किं/हे.) : १८-२२

**वैशिष्ट्ये** : अधिक उत्पादन, केवडा रोगास प्रतिकारक महाराष्ट्रात व आंध्र प्रदेशात लागवडीसाठी.

**५) पी.डी.के. व्ही.एस. एच.९५२-** कालावधी (दिवस) : ९०-९५

उत्पादन (किं/हे.) : १८-२०

**वैशिष्ट्ये : मध्यम कालावधी, विदर्भात लागवडीसाठी योग्य.**

रब्बी हंगामात कोरडवाहू क्षेत्रात करडईनंतर सूर्यफुल हे पिक तेलबिया पिक घेतले जाते. खरीप पिकाचा विचार केला तर रब्बी हंगामात जमिनीत साठवलेल्या ओलाव्यावर हे पिक घेतले जाते. पिक वाढीच्या काळात पावसाचा खंड पडला म्हणून पिकाचे नुकसान झाले असे होत नाही. कारण जमिनीच्या प्रकानुसार जमिनीत किती ओल साठविलेली आहे आणि पिकाची गरज हे आपणास पिक पेरणीच्या वेळी माहित असते.

म्हणून खरीपापेक्षा रब्बी हंगामात हमखास उत्पादन मिळण्याची शाश्वती असते.




# पोटावर साचलेली चरबी महिनाभरात कमी, फक्त ४ व्यायाम करा! सुटलेलं पोट गायब



**दि.१५ विदर्भ प्रजासत्ताक**

सुटलेलं पोट हा अनेक जणांपुढचा विषय आहे. वयाचा एक ठराविक टप्पा ओलांडला की अनेकांचं पोट सुटतं. याचं कारण म्हणजे बैठं काम, चयापचय क्रियेत होणारा बदल, आहारावर नियंत्रण नसणे, व्यायामाचा अभाव.. महिलांच्या बाबतीत सांगायचं झालं तर बाळंतपणानंतर अनेकींच्या ओटीपोटावरची चरबी खूप वाढते.

पोटावर लटकणारी चरबी कमी करता करता अनेकींच्या नाकीनऊ येतात. पण जर तुम्ही योग्य पद्धतीने, योग्य व्यायाम, योग्य प्रमाणात केले तर मात्र पोटावरची चरबी बऱ्याच प्रमाणात कमी होऊ शकते, असं फिटनेस ट्रेनर नादिया मरडॉक्स सांगतात

ते व्यायाम नेमके कोणते याविषयी त्यांनी दिलेली माहिती शर्लीहळी.लो या साईटवर शेअर करण्यात आली आहे.

त्यापैकी पहिला व्यायाम आहे सुमो स्कॅट्स. हा व्यायाम करण्यासाठी दोन्ही पायांमध्ये थोडं अंतर घेऊन उभे राहा. दोन्ही हात एकमेकांत गुंफुन छाती जवळ घ्या. त्यानंतर गुडघे वाकवून शरीर खाली करा. यामध्ये पाठीचा कणा ताठ ठेवा. एका सेटमध्ये दहा ते बारा वेळा हा व्यायाम करा. असे साधारण पाच सेट करा.

दुसरा व्यायाम आहे डीपसश ढर्जिी. हा व्यायाम करण्यासाठी दोन्ही पायात अंतर घ्या. उदा. उजवा तळपाय उजव्या दिशेला करून शरीर उजव्या बाजूने करा. दोन्ही हात छातीजवळ एकमेकात बांधून ठेवा. यानंतर शरीर पुढे झुकवून डावा पाय उचलून मागे करा. शरीर एका रेषेत पूर्णपणे आडवे झाले पाहिजे, अशा पद्धतीने हालचाल करा. त्यानंतर पुन्हा पहिल्या पोझिशनला या. असे ८ ते १० वेळेस करा.

असे साधारण ५ सेट करा.तिसरा व्यायाम आहे पुशअप्स. ८ ते १२ वेळेस पुशअप्स करा. असे साधारण ५ सेट करा.

नियमितपणे प्लँक आणि त्याच्यातले वेगवेगळे व्यायाम केल्यानेही ओटीपोटावरची चरबी कमी होते. सुरुवातीला प्लँकची पोझिशन साधारण ३० सेकंदासाठी टिकवून ठेवा. त्यानंतर हळूहळू तुम्हाला शक्य होईल त्याप्रमाणे वेळ वाढवत न्या...

# काँग्रेस पक्षाच्या राज्य निवड मंडळाची बैठक टिळक भवन येथे संपन्न




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ मुंबई-** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या राज्य निवड मंडळाची बैठक पक्षाचे दादर येथील मुख्यालय टिळक भवन येथे प्रभारी रमेश चेन्नीथला व प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाली. आगामी विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात यावेळी सर्व जिल्ह्यातील प्रमुख नेते व पदाधिकारी यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीला बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मुकुल वासनिक, गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, खा. चंद्रकांत हंडोरे, खा. प्रणिती शिंदे, मुझफ्फर हुसेन, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड, माजी मंत्री नितीन राऊत, सुनील केदार, यशोमती ठाकूर, के. सी. पाडवी, अस्लम शेख, विश्वजित कदम, रजनी पाटील, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव बी. एम. संदीप, कुणाल चौधरी, बी. व्ही. व्यंकटेश, संजय दत्त, रामकिशन ओझा, पृथ्वीराज साठे, आ. भाई जगताप. आ. अमिन पटेल, मा. खा. हुसेन दलवाई, वसंत पुरके, सतिश चतुर्वेदी, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे, महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे, सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत, एस.सी. विभागाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ हत्तिअंबिरे, एनएसयुआयचे प्रदेशाध्यक्ष आमिर शेख, प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी, प्रदेश सरचिटणीस प्रमोद मोरे आदी उपस्थित होते.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १५ ऑक्टोबर २०२४

शहर/ग्रामिण


### विश्यपणा केंद्र , बेंडोजी महाराज संस्थांच्या विकासाला देणार निधी

# आ प्रताप अडसड यांनी पंधरा वर्षाचां विकास केवळ अडीच अडीच वर्षात केला





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५धामणगाव रेल्वे–** संयमी, अभ्यासू जिद्द चिकाटी विकासाची तडमळ असलेल्या आमदार प्रताप अडसड यांनी पंधरा वर्ष माघारलेल्या धामणगाव मतदार संघाचां विकास केवळ अडीच वर्षात केला आ प्रताप अडसड यांच्या कार्य कुशलतेने व आपल्या आशीर्वादाने पुढील पाच वर्षात राज्यात विकासाचे मॉडेल हे धापणगाव मतदार संघ ठरेल असा आशावाद उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त करीत धामणगावात विंष्यपणा केंद्र , बेंडोजी महाराज संस्थानाला निधी उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी सांगितलेधामणगाव रेल्वे मतदारसंघातील २३५३ कोटी १२ लक्ष रुपयांच्या एकत्रीत विकास कामाचे भूमिपूजन व लोकार्पण निमित्त चित्रफित वरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपा कार्यकर्ते व सर्वसामान्य नागरिकांशी संवाद साधला गत अनेक वर्ष हा मतदारसंघ विकासापासून दूर होता कोणत्या विभागातून कसा निधी आणायचा याचा अभ्यास आमदार प्रताप अडसड यांना आहे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत युवा आमदार असलेल्या प्रताप अडसड यांना मतदानस्वरूपी आशीर्वाद आपण द्यावा राज्यात विकासाचे मॉडेल हे धामणगाव मतदार संघ निश्चित ठरणार असल्याचे ते म्हणालेविदर्भात दुसरे तर अमरावती जिल्ह्यात पहिले असलेल्या विज्ञान केंद्राचे उद्घाटन आमदार प्रताप अडसड यांच्या हस्ते करण्यात आले विद्यार्थ्यांना आता पुस्तकरुपी ज्ञानापेक्षा प्रत्यक्षात आपली कल्पना या विज्ञान केंद्रातून साकारता येणार आहे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी हे केंद्र सहज उपलब्ध होईल विद्यार्थ्यांनी दररोज संविधानाची पाच पाने वाचावीत त्यातून आपले अधिकार कर्तव्य समजून घ्यावे ते भविष्यात समाज उन्नतीसाठी निश्चित कामे पडेल असे आमदार प्रताप अडसड म्हणाले धामणगाव तालुक्यातील चार हजार विद्यार्थ्यांनी पहिल्या दिवशी या विज्ञान केंद्राला भेट देऊन १७८ साहित्याची माहिती मिळवून घेतलीयावेळी माजी जि प सभापती रामदास निस्ताने, न प मुख्याधिकारी अमोल माळकर, शिवसेना शिंदे गटाचे मनोहर बारसे, माजी जि प सदस्य रवींद्र मुंदे, आठवले गटाचे प्रशांत मुन अनिता तिखीले, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दुर्गाबक्षसिह ठाकूर यांनी आपले मत व्यक्त केले संचालन व आभार अशोक शर्मा यांनी केले यावेळी मंचावर धामणगाव विधानसभा प्रमुख रावसाहेब रोंठे,मनोज डहाके, हरिचंद्र खंडारकर ,मोहन गावंडे उषा तीनखडे, नलिनी मेश्राम, मोहन इंगळे, अनिल राठी, विठ्ठलराव राळेकर, राजकुमार केला अनिकेत ठाकरे बबनराव गावंडे, अपर्णा जगताप, शेख कयुम, गिरीश भुतडा, शोभाताई हिवसे, व धामणगाव रेल्वे चांदुर रेल्वे नांदगाव खंडेश्वर येथील भाजपा, शिवसेना शिंदे गट ,राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



# संत श्री देवनाथ महाराज यांचे नाव अंजनगाव सुर्जी आय टी आय ला

### संतांचे सामाजिक व आध्यात्मिक कार्य विद्यार्थ्यांना दिपस्तंभासारखे... आचार्य श्री स्वामी जितेंद्रनाथ महाराज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती–** भारतातील ऐतिहासिक संतपरंपरापैकी संत श्री देवनाथ महाराज यांचे नाव अंजनगाव सुर्जी आय टी आय ला देऊन शासनाने सामाजिक दृष्ट्या एकात्म भारत निर्मिती चे दर्शन घडवीले असल्याचे प्रतिपादन श्री देवनाथ पिठाचे श्रीनाथ पिठाधीश्वर परमपूज्य आचार्य श्री स्वामी जितेंद्रनाथ महाराज यांनी नामांतर सोहळ्याचे उदघाट्न करतांना केले. हा नामांतर सोहळा अंजणगाव सुर्जी आय टी आय येथे ११ऑक्टोबर २४ रोजी संपन्न झाला.या सोहळ्याला आय टी आय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा. प्रवीण नेमाडे, माजी आमदार रमेश बुंदेले,कृ ऊ बा समितीचे संचालक विकास येवले, उद्योजक सुधाकर दोंदलकर, ऍड.पद्माकर सांगोळे, राजू आकोटकर, गोपाल चंदन,सागर भास्कर, अखिल भारतीय संघटन मंत्री वृषाली ताई जोशी, माधुरी लोंदे ताई, डॉ.विशाल कविटकर,आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.सर्वप्रथन श्री स्वामी जितेंद्रनाथ महाराज यांचे शुभ हस्ते संत श्री देवनाथ महाराज यांच्या नावाच्या कोनशीलेचे उदघाट्न करण्यात आले. त्यानंतर श्री स्वामी जितेंद्र महाराज यांनी दीप प्रज्वलन करून मंगलमय सोहळ्याला सुरवात करून दिली.संस्थेकडून प्रमुख अतिथीचा शाल, श्रीफळ व पुष्पगुछ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी संत श्री देवनाथ महाराजांच्या कार्यकाळातील तसेच त्यांचेनंतरच्या उत्तराधिकाऱ्यांच्या सामाजिक व अध्यात्मिक कार्याचा आढावा संस्थेचे प्राचार्य राजेश शेगोकार यांनी आपल्या प्रास्ताविकातून विद्यार्थी, पालक, उपस्थित भक्तगण यांचे पुढे मांडला. आशीर्वाद कार्यक्रमातून उच्च विद्या विभुषित आचार्य श्री स्वामी जितेंद्र नाथ महाराज यांनी संत देवनाथ महाराज मठाच्या माध्यमातून संपूर्ण भारतभर शेकडो वर्षांपासून सुरु असलेल्या लोकोपयोगी, जनकल्याण तसेच अध्यात्मिक विविध उपक्रमाबद्दलचा लेखाजोखा आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून मांडला. भविष्यात आय टी आय च्या मुलामुलींसाठी कौशल्य विकासाबाबत रोजगार निर्मिती करण्याचे आमचे ध्येय असल्याचा दृढसंकल्प त्यांनी उपस्थितासमोर बोलून दाखविला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मत व्यक्त केले.या नामांतर सोहळ्याला संस्था व्यवस्थापन समितीचे सभासद मा. दिवाकर बिंड, सतीश लोणकर, व्ही एन श्रीवास्तव, ए जी माहुलकर उपस्थित होते. या नामांतर सोहळ्याचे संचालन शिल्पनिदेशक आशिष जोशी यांनी तर आभारप्रदर्शन गौतम वाहूरवाघ यांनी केले. या सोहळ्याला शहरातील गण मान्य व्यक्ती,महाराजांचे भक्तगण, विद्यार्थी, पालक, शिक्षक, कर्मचारी वर्ग उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेतील शिल्प निदेशक खरात सर, वानरे सर,दांडगे सर, वानखडे सर, आस्वार मॅडम,केदार सर, अस्वार सर, विनोद कांबळे, मनोज गवई, सौं ममता कांबळे, सौं सोनाली हिरोळे, संदीप बोदडे, हतेले, काठोडे, भावे, धुळे, हरणे यांनी अथक परिश्रम घेतले.



# रस्तावरिल खोक्यांना पोलिसांचे अभय नागरिकांच्या निवेदनाला केराची टोपली

### पोलीस अधिकाऱ्यांना दिले होते एक महिन्यापूर्वी निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अचलपूर–** अचलपूर येथील तहसील कार्यालय अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले असून रस्त्यावर असलेल्या खोक्यांमुळे वाहनधारकांना जाणे येणे मुश्किल झाले आहे शिवाय पार्किंगचा ही प्रश्न निर्माण झाला आहे यासंदर्भात तेथील व्यावसायिकांनी उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन देऊन एक महिना उलटला तरी अद्याप कुठलेही कारवाई करण्यात आलेली नाही रस्त्यावरील अतिक्रमित टिनाचे खोके त्वरीत हटवावे व रस्ता मोकळा करावा अशी मागणी जनतेने केली आहे तहसील कार्यालयाजवळ विविध व्यवसाय करणाऱ्या लोकांनी उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना दिनांक १२/ ९/ २०२४ रोजी दिलेले लेखी निवेदन असे की तालुक्यातून तहसील कार्यालय अचलपूर येथे खरेदी विक्री नोंदणी करणारे नागरिक तहसील कार्यालय अचलपूर येथे आपल्या कामकाजासाठी येत असतात तहसील कार्यालयाच्या मागील बायपास रोडवर अवैध व्यवसायकांनी टीनाचे खोके ठेवल्याने रहदारीचा रस्ता अरुंद झाला आहे त्यामुळे तेथून ये जा करणाऱ्या वाहनधारकांना आपले वाहन चालवणे मुश्किल झाले आहे त्यांना अनेक अडथळे पार करत रस्ता पार करावा लागत आहे तसेच उपजिल्हा रुग्णालयाकडे जाणारा हा रस्ता जाणाऱ्या रुग्णवाहिकेला अडथळा निर्माण होत असतो रुग्णवाहकांना तात्काळ जाता येत नाही त्यामुळे गंभिर दुखापत किंवा आजारी जाणाऱ्या रुग्णाचा जीवही जाऊ शकतो अवैध टिन व्यावसायिकाचे खोके रोडवर असल्याने कामानिमित्त येणारे लोक रस्त्यावर उभे राहूनच आपले काम करत असल्याने त्यांच्या सुद्धा जीवाला धोका निर्माण झाला असेही दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे सदर निवेदनावर गोविंद चरपटे , , श्याम शर्मा ,राहुल गाठे,अमित शहाकार अविनाश काकडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत पोलिसांचे हात वर सदर रस्त्यावरी ल अतिक्रमणाबाबत पोलिसांनी हात वर केले असून ही जबाबदारी नगरपरिषदेवर ढकलली आहे नगरपरिषद पत्र लिहून अतिक्रमण काढण्याची कारवाई करण्यात यावी त्यामुळे वाहतुकीचा अडथळा होणार नाही तसेच मोठा अपघात होणार नाही असे पत्र पोलीस कर्मचारी जमील खान ह्यांनी नगरपरिषदेला दिले असून त्याची एक प्रत गाठे यांना दिली आहे.

# थोर पुरुषांच्या कार्याची शिकवण व प्रेरणा विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक ठरावी- खासदार डॉ.अनिल बोंडे

### रहाटगाव आय टी आय ला दादासाहेब खापर्डे यांचे नाव



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती–**अमरावतीचे सुपुत्र,स्वातंत्र्य सेनानी, नावाजलेले विधिज्ञ् थोरपुरुष दादासाहेब खापर्डे हे करारी व असामान्य व्यक्तिमत्व होते.त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात लोकमान्य टिळक यांचे सोबत खांद्याला खांदा लावून केलेल्या असामान्य कार्याची दखल महाराष्ट्र शासनाने घेतली असून त्यांच्या कार्याची शिकवण व प्रेरणा विद्यार्थ्यांसाठी नेहमीच दिशादर्शक ठरेल असे प्रतिपादन राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोन्डे यांनी आज रहाटगाव एस सी पी आय टी आय येथील नामकरण समारंभात केले.राज्याचे कौशल्य विकास, उद्योजक्ता, रोजगार व नावीन्यता मंत्री मा. मंगलप्रभात लोढा यांच्या पुढाकाराने रहाटगाव आय टी आय ला दादासाहेब खापर्डे यांचे नाव देण्यात आले.या नामकरण समारंभा चे उदघाट्न खासदार डॉ. अनिल बोन्डे यांचे हस्ते संपन्न झाले.प्रमुख अतिथी म्हणून अमरावती विभागाचे सहसंचालक प्रदीप घुले, सहाय्यक संचालक रवींद्र लोखंडे, कौशल्य विकास विभागाच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर संस्थेचे प्राचार्य आनंद वाळके, उपप्रचार्य संजय महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.या नामांतर समारंभाचे सूत्र संचालन कु कावेरी म्हस्के मॅडम, प्रास्ताविक आरती यादव मॅडम यांनी .तर आभार प्रदर्शन प्राचार्य आनंद वाळके यांनी केले.या समारंभाच्या यशस्वीतेसाठी सर्वश्री सातपुते सर निस्ताने सर,मुसळे सर उबरहांडे सर, खरात सर,हरले सर, पालवे सर,शेख सर, सिसोदे सर, थोटे सर,खटाळे सर,भोकरे मॅडम, कुथे मॅडम सोनटक्के, नागे, सौ पाटील मॅडम, सौं महल्ले मॅडम, सूरज रगडे, खराळे, मनोज पच्छेल, आनंद वानखडे अमृत वानखडे,ज्योती कुमार कनोजे आदी अथक परिश्रम घेतले.

# न. प. ला आली जिल्हाधिकारी मार्गदर्शनची आठवण

### पुरातत्व सर्वेक्षण नियमाचे उल्लंघन, विठ्ठलवाडी भूखंड नियमितकरण


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५ अचलपूर–** विठ्ठलवाडीतील गुंठेवारी भूखंड नियमिती करणास व बांधकामात पुरातत्व सर्वेक्षण नियमाचे नगर परिषद कडून सर्रास उल्लंघन झाले असल्याची बाब उघडकीस आली न. प. चे मनमानी कार्यपपद्धतीवर मुख्यधिकारी गोहाड जवाबदार असल्याचे निदर्शनास येते प्राप्त माहिती नुसार अचलपूर विठ्ठलवाडी देशमुख लेआऊट जिल्हाधिकारी अमरावती यांचे कडून ११ प्लॉट अकृषक परवानगी घेतली होती मुळमालक देशमुख यांनी ११ प्लॉटचे नियमात फेरबदल करून लगतचे सर्वे न. १,३,,६ ऐकत्रितपणे अधिकृत व अनधिकृत अभिन्यास ५८ प्लॉट जिल्हाधिकारी परवानगी आधारावर खरेदीदारांना विकल्याप्रमाणे तेथे नगर परिषद ने आरक्षित जागेचा विकास योजना कामाची अंमलबजावणी झाली नसल्याने अनधिकृत रहिवाशी वापर सुरु ठेवला २०१२-१३ मध्ये न.प. ने तेथील अनधिकृत भूखंड नियमाकुल केले होते परंतु पुरातत्व सर्वेक्षण चे संमती शिवाय भूखंड किंवा बांधकाम नियमाकुल करता येत नसल्याचे आधारावर विठ्ठलवाडीतील योजनेतील सर्व लाभार्थना पत्र पाठवून मुख्यधिकारी धीरज कुमार गोहाड यांनी २०२४ मध्ये पुरातत्व सर्वेक्षण कार्यालयाचे संमती शिवाय काही अनधिकृत भूखंड २०२४ मध्ये नियमाकुल केले कसे तर काही भूखंड जिल्हाधिकारी यांचे मार्गदर्शन मिळण्यास दि. ३/१०/२०२४ रोजी पाठवलेले पत्राचे वृत्त आहे.

# मागासवर्गीयांच्या विकासासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत : आनंदराव अडसूळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

अनुसूचित जाती आणि जमातीच्या नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्या विभागांवर योजना राबविण्याची जबाबदारी आहे, त्यांनी मागासवर्गीयांच्या विकासासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत, असे आवाहन अनुसूचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ यांनी केले. येथील विश्रामगृहात श्री. अडसूळ यांनी समाज कल्याण आणि आदिवासी विकास विभागाचा आढावा घेतला. यावेळी प्रादेशिक उपायुक्त सुनिल वारे, उपायुक्त जया राऊत, सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर आदी उपस्थित होते.श्री. अडसूळ यांनी ॲट्रॉसिटी कायदा, रमाई आवास, विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, स्वाधार योजना, विद्यावेतन, सबळीकरण योजना, कन्यादान योजना, अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत मिळणारा निधी, जाती



पडताळणी आदींबाबत आढावा घेतला. मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये अडचणी आल्यास आयोगाच्या माध्यमातून त्यावर मार्ग काढण्यात येईल. आवश्यक असलेल्या ठिकाणी पाठपुरावा करून न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. शासकीय योजनांचा लाभ गरजूंना मिळाल्यास सामाजिक स्तर उंचावण्यास मदत होणार आहे. त्यामुळे तक्रारीच्या प्रकरणी तात्काळ कार्यवाही होणे गरजेचे आहे. शहरी भागातील मागासवर्गीयांसाठी असलेल्या घरकुल योजनांची अंमलबजावणी होण्यासाठी योग्य ते निर्देश देण्यात येतील. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात पडताळणी सादर करण्यासाठी मुदतवाढीसाठी प्रयत्न करण्यात येतील. वसतीगृहाचा लाभ मिळाला नसल्यास त्यांना स्वाधार योजनेचा लाभ देण्यात येतो. अशा विद्यार्थ्यांना वेळेवर लाभ मिळण्यासाठी आवश्यक ते पावले उचलण्यात येतील. शासकीय यंत्रणांना अधिकार प्राप्त असतात. या अधिकाराचा उपयोग अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन श्री. अडसूळ यांनी केले.

# मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वन्यजीव सप्ताहाचा समारोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

मेळघाट व्याघ्र प्रकल्प आणि विविध संस्थांतर्फे १ ते ७ ऑक्टोबर २०२४ दरम्यान वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. यानिमित्ताने आयोजित स्पर्धांचा बक्षिस वितरण कार्यक्रम वनसंरक्षक तथा मेळघाट व्याघ प्रकल्पाचे क्षेत्र संचालक एम. आदर्श रेड्डी यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी मानद वन्यजीव रक्षक जयंत वडतकर, निशिकांत काळे, अनिल आसोले, प्रा. गजानन वाघ, सर्वेश मराठे आदी उपस्थित होते.वन्यजीव सप्ताहात वने व वन्यजीव यावर आधारीत चित्रकला, निबंध, वकृत्व,




परिसंवाद, छायाचित्र, फेस पेंटिंग, घोषवाक्य, निसर्ग प्रश्न मंजुषा स्पर्धा पार पडल्या. यात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती, विनायका गुरुकुल, होलीक्रॉस इंग्लिश हायस्कूल, कस्तुरबा इंग्लिश हायस्कूल, अमरावती, श्रीराम विद्यालय, शिवाजी बहुउद्देशीय शाळा, जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा, ज्ञानमाता इंग्लिश हायस्कूल, मनीबाई गुजराथी हायस्कूल, नारायणा हायस्कूल, शारदा विद्यालय, तखतमल इंग्लिश स्कूल, अभ्यासा हायस्कूल, प्रेमकिशोर सिकची हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्राविण्य प्राप्त विध्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.मेळघाट व्याघ्र प्रकल्प आणि स्टँडिंग फॉर टायगर संस्था, परतवाडा, ऑर्गनायझेशन फॉर कुला, मेळघाट, युथ फॉर नेचर कंझर्वेशन, अमरावती, निसर्ग संरक्षण संस्था, निसर्ग कट्टा संस्था, अकोला, अरण्यंम संरक्षण संस्था, प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्र, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, परतवाडा यांच्या संयुक्त विद्यमाने क्षेत्रीय स्तरावर शालेय विद्यार्थ्यांसाठी ट्रेकिंग, वन्यजीव आधारीत माहितीपट व सादरीकरण, जंगल भ्रमंती, निसर्ग शिबीर, वन्यजीव जनजागृती दिंडी, ओळख करू फुलपाखरांची, पत्रकारिकेतून वनसंवर्धन यावर आधारित व्याख्यानमला, स्वच्छता अभियान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यातून शालेय विद्यार्थ्यांना वने व वन्यजीव संवर्धनाबाबत जागृती करण्यात आली.उपजीविका तज्ज्ञ ज्ञानदीप तराळे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी वन्यजीव व संशोधन मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे विभागीय वन अधिकारी एम. एन. खैरनार, वनपाल प्रदीप भड, वनरक्षक संदीप खंडारे, रेखा कोकरे, रेशमा वानखडे, दीपा बेलाह, पर्यटन व्यवस्थापक स्वप्नील बांगडे, सामाजिक समन्वयक अतुल तिखे, ग्राफीक डिझायनर आनंद विपट, रोशन गोयटे यांनी पुढाकार घेतला.

# महिला मेळाव्यात आरोग्य विभागाकडून जनजागृती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

सायंस स्कोर मेळाव्यात आरोग्य विभागातर्फे आयोजित महिला मेळाव्यात जनजागृती करण्यात आली.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले आणि अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे यांच्या मार्गदर्शनात आरोग्य विभागाचा हेल्थ स्टॉल उभारण्यात आला. यात जिल्हास्तरीय महिला सक्षमीकरण प्रक्रिया लोकाभिमुख करुन महिलांना संघटित करून प्रशिक्षित करणे, स्वावलंबी करणे, महिलांशी संबंधित योजना लोकाभिमुख करणे, महिला सशक्तीकरण योजना व महिलांच्या संबंधित राबविण्यात येत असलेल्या इतर योजना महिलापर्यंत पोहचविण्यासाठी महिला मेळावा पार पडला. जिल्ह्यामधील महिलांना या योजनांची माहिती देण्यात आली. यामुळे महिलांना विविध योजनांचा लाभ घेता यावा, त्यासाठी महिला मेळाव्यामध्ये प्रचार व प्रसिध्दी करण्यात आली. आरोग्य सेवक श्री. भिलकर, आरोग्य सेवक श्री. बागडे, अवैद्यकीय पर्यवेक्षक दिपक गडलिंग, ज्ञानेश्वर डोंगरे, श्री. मारोडकर यांनी पुढाकार घेतला.

# मत्स्यव्यवसाय विभागात डाटा एन्ट्री ऑपरेटर पदाची तात्पुरत्या स्वरूपात भरती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक) कार्यालयातील एका 'डाटा एन्ट्री ऑपरेटर' या पदाची कंत्राटी पद्धतीने ११ महिन्यासाठी नेमणूक करण्यात येणार आहे. यासाठी आवेदन अर्ज मागविण्यात आले आहे.सदर पदासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत शुक्रवार, दि. २२ ऑक्टोबर २०२४ आहे. जाहिरात आणि आवेदन अर्जाचा नमुना सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तां.) श्री. पुंडकर यांची इमारत, पहिला माळा, अतुल मंगल कार्यालय जवळ, रूख्मिणीनगर, अमरावती येथे सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

# आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी महायुती-भाजप सरकार कटिबद्ध : उद्योगमंत्री उदय सामंत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ धारणी**

मेळघाटातील आदिवासी समाज बांधवांच्या सर्वागीण विकासाच ध्येय जोपासून राज्यातील महायुती-भाजप सरकार प्रयत्नरत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या अनेक योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासोबतच मागास परिसराचि विकासासाठी पूर्ण ताकदीने आम्ही येत्या निवडणुकीत समोर जाणार आहेत त्यासाठी तुम्ही खंबीरपणे आमच्या पाठीशी राहा, व महायुती-भाजप सरकारचे हात मजबूर करा, असे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री नामदार उदय सामंत यांनी व्यक्त केले.

मेळघाट परिसरातील ७०७ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांच भूमिपूजन तथा प्रशासकीय इमारतीच्या लोकार्पण सोहळ्यानिमित्त




हायस्कुल मैदानावर ते विशेष संबोधनात्पर बोलत होते.

यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या व्यासपीठावर केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, अनुसूचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष आनंदराव अडसूळ, विद्यमान आमदार पटेल तथा ईतर मान्यवर उपस्थित होते.

नामदार सामंत पूढे म्हणाले की, मेळघाट परिसराच्या विकासासाठी महायुती-भाजप तथा इतर सर्व लोकप्रतिनिधी आग्रही आहेत. या भागाचा विकास व्हावा यासाठी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी सुचविलेल्या मार्गदर्शक सुचना व विकासात्मक कामांची गरज ओळखून याभागात विशेष निधी पुरवून भक्कम कामे करण्यात येत आहेत.

तसेच मेळघाटातील आवश्यक असणारी लोक विकासात्मक सर्व कामे यापूढेही तातडीने पूर्ण व्हावीत यासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. आदिवासी भागाचा सर्वागीण विकास व लोक आग्रही इतर सर्व कामे करण्यासाठी यापूढेपण कोणतीही अडचण येणार नाही.


महायुती-भाजप सरकार या आदिवासी जनजमातीय भागाचा कायापालट करण्यासाठी सहकार्य सर्वतोपरीने प्रयत्नशील आहे. तर केंद्रीय राज्यमंत्री नामदार प्रतापराव जाधव यांनी, महिला शेतकरी आणि सर्व घटकांसाठी शासनातर्फे विविध योजना राबविण्यात येत असून गेल्या अडीच वर्षाच्या काळात या परिसरात विविध विकासकामे करण्यात आली आहे. यात तळागाळातील महिला आयाबहीणींना लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच मुलींसाठी मोफत शिक्षण, महिलांना अर्ध्या तिकिटात एसटीचा प्रवास यासह आशा सेविका, पोलीस पाटील यांचे मानधन वाढविण्यात आले आहे. बचत गट आणि मातृत्व योजनेतून महिलांना सहकार्य करण्यात आले आहे. शेतकरी सन्मान योजनेतून दरवर्षाला १२ हजार रुपयांची मदत देण्यात येत आहे. तसेच पिक विम्याची रक्कम वाढविण्यात आल्याने शेतकऱ्यांना फायदा होत आहे. येत्या काळात सर्व ठिकाणी आरोग्य सुविधा, रस्ते आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याने या भागाचे चित्र बदलणार असल्याचे मत आपल्या प्रदीर्घ मार्गदर्शनात्पर भाषणातून स्पष्ट केले.

यावेळी माजी खासदार तथा अनुसूचित जाती जमाती आयोग अध्यक्ष अडसूळ यांनी अनुसूचित जाती जमातीच्या विकासासाठी राज्य तथा केंद्र सरकार पूर्ण ताकदीने उभी असून येणाऱ्या काळी अधिक जोमाने पिडीत, दलीत वंचित घटकासाठी कार्य तेवढ्याच अधिक ताकदीने करण्यात येणार असल्याचे मत व्यासपीठावरून व्यक्त केले.

तत्पूर्वी प्रशासकीय इमारतीचे उद्योगमंत्री नामदार उदय सामंत हस्ते फित कापूस लोकार्पण झाले. यावेळी मेळघाटे विद्यमान आमदार पटेल, सहाय्यक जिल्हाधिकारी प्रियवंदा म्हाडदळकर, तहसीलदार प्रदिप शेवाळे, गटविकास अधिकारी कसुरकर तथा जिल्ह्यातील खातेनिहाय वरिष्ठ अधिकारी वर्ग मोठ्या संख्येत उपस्थित दिसून आला.

तदपश्चात अंगणवाडी सेविका, पोलिस पाटिल, रोजगार सेवक आणि लाडकी बहिण लाभार्थीचा केंद्रीय राज्यमंत्री नामदार प्रतापराव जाधव हस्ते व्यासपीठावरून सत्कार घेण्यात आला.

# जुने कर आकारनीनुसार मालमत्ता कर वसुल करण्याची प्रक्रिया सुरु



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

महानगरपालिका क्षेत्रातील वर्ष २०२४ मध्ये नवीन वाढीव कर आकारणी व वसुलीला शासनाकडून स्थगिती मिळाल्यानंतर जुन्याच पध्दतीने कर लागू करण्यात आला आहे. आता शहरातील मालमत्ता धारकांना जुन्या दरानुसार कर आकारणी करुन सुधारीत बिले पाठविण्याची कार्यवाही सुरु झाली आहे. नव्या आदेशानुसार आता जुन्याच दराने मालमत्ता कर आकारणी आणि वसुली केली जाईल. ज्यांनी यापूर्वी कराचा भरणा केला, अशांची रक्कम चालू वर्षाचे कराचे मागणी व आगाऊ रक्कम म्हणून गृहीत धरण्यात येत आहे. ज्यांनी कर भरला नाही, अशांना दुरुस्ती करून जुन्याच पद्धतीने कराची देयके राहणार आहे.

तरी सर्व मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरून अमरावती महानगरपालिकेला सहकार्य करावे असे आवाहन अमरावती महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

# राष्ट्रीय जनजाती आयोगातर्फे विविध ठिकाणी भेटी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

राष्ट्रीय जनजातीय आयोगाचे अध्यक्ष अंतरसिंह आर्य व आयोगाचे सदस्यांनी दि. ७ व ८ ऑक्टोबर या दोन दिवशी जिल्ह्यातील मोर्शी आणि अमरावती येथे भेटी देऊन आदिवासी समाजाच्या समस्या जाणून घेत प्रत्यक्ष भेटी दिली.आयोगाचे अध्यक्ष अंतरसिंह आर्य आणि सदस्य राजीव सेक्सेना, वरिष्ठ अन्वेषक अंकित सेन, गोवर्धन मुंडे, अमृतलाल प्रजापती यांनी जिल्ह्याचा दौरा केला. यात जिल्हाधिकारी कार्यालयातील आढावा बैठकीला अंतरसिंह आर्य उपस्थित होते. बैठकीत सर्व शासकीय विभागांचा आढावा घेण्यात आला. यावेळी वन विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करण्याबाबत निर्देश दिले. तसेच अद्यापही पक्के रस्ते नसलेल्या गावामध्ये तातडीने रस्ते मंजूर करण्याचे निर्देश बांधकाम विभागाला देण्यात आले. सिकलसेल निमिया आजाराची तपासणी करून आवश्यक उपायोजना करण्याच्या सूचना आरोग्य विभागाला केल्या. अनुसूचित जमातीच्या नागरिकांना गावामध्ये मुलभूत सोईसुविधा पोहचतील या अनुषंगाने आवश्यक उपायोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.

# राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती**

अमरावतीसह राज्यातील सर्व न्यायालयात दि. ३० नोव्हेंबर आणि दि. १ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.लोकअदालतीमध्ये दाखल आणि दाखलपूर्व अशी प्रकरणे तडजोडीने आणि सामंजस्याने निकाली काढण्यासाठी ठेवण्यात येते. नागरिक, तसेच पक्षकारांनी राष्ट्रीय लोकअदालती समक्ष आपली प्रकरणे सामंजस्याने व तडजोडीने मिटवावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र




न्यायाधीश मंगला कांबळे यांनी केले आहे.राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या सूचनेनुसार राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय लोक अदालतीत सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क भरावे लागणार नाही. नागरिक तसेच पक्षकारांनी तडजोडप्राप्त प्रलंबित खटले राष्ट्रीय लोक अदालत समक्ष तडजोडीने व सामंजस्याने मिटविण्यासाठी संबंधित न्यायालयात अर्ज करावा. तसेच दाखलपूर्व प्रकरणांबाबत नजिकच्या जिल्हा किंवा तालुका न्यायालयाशी संपर्क साधावा लागणार आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव मंगला कांबळे यांनी दिली आहे.

# श्री तुळजाभवानी मंदिर येथे शारदीय नवरात्रौत्सव निमित्ताने श्रीमद् भागवत कथा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ चांदूरबाजार**

श्री तुळजाभवानी मंदिर ट्रस्ट चांदुर बाजार येथे प्रथमच शारदीय नवरात्रौत्सव निमित्ताने श्रीमद् भागवत कथा व देवी महात्म्य गुरूवार दि.०३/१०/२४ ते ११/१०/२४ पर्यंत आयोजित करण्यात आले होते. ह.भ.प. श्री श्रीजयमहाराज चव्हाण मोझरी, यांच्या सुमधूर वाणीतुन ही भागवत कथा संपन्न झाली,

मोर्शी रोड स्थित श्री तुळजाभवानी मंदिरात ०३ ला तिर्थस्थापना, घटस्थापना व ध्वज स्थापना करून या कथेला रोज दुपारी ३ ते ६ पर्यंत सुरुवात झाली.

शारदीय नवरात्र उत्सवात संपूर्ण १० दिवस विविध प्रकारचे कार्यक्रम पार पडले, त्यामधे मुख्यता, शुक्रवार दिनांक ०४ तारीखेला सामुहिक श्री दुर्गा सप्तशती पाठ करण्यात आला वाचक सौ देशमुख ताई या होत्या.

सोमवार दिनांक ७ ला सकाळी श्री ललिता पंचमी निमित्ताने करंडक स्वरूपीनी ऊपांग ललीता पुजन व कुंकू मार्चन सामुहिक सेवा करून रात्री ६ ते ८ पर्यंत श्री ललिता सहस्त्रनाम व श्री ललिता त्रिशती या ग्रंथाचे होम हवन संपन्न झाले पौरोहित्य - पं.अण्णाशास्त्री चव्हाण व सौ मेघाताई भट यांनी केले. तसेच गुरूवार दि.११/१०/२४ ला अष्टमी व नवमी एकत्र आल्या



कारणाने श्री चंडी महायज्ञ सकाळी ९ ते १२ या वेळी श्री चौधरी व श्री राजाभाऊ देशमुख या उभयतांनी व परिसरातील महिला भगिनींसह संपन्न झाला.त्यानंतर कन्या पुजन सौ व श्री संतोषभाऊ डोळे यांचे हस्ते संपन्न झाले ,

त्यानंतर काल्याचे किर्तन श्री एकनाथ राऊत महाराज सांगविकर, यांच्या हस्ते होऊन महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

संपुर्ण कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व भगिनीं यामध्ये मुख्यतः सौ चंद्रकलाताई फुटाणे, श्रीमती प्रभाताई निचळ,सौ सोनाली धोरण, सौ.शितल वाघ, कविता साबळे, मुक्ता गतफणे,सिमा इंगोले, शितल पेठे,भारती चौधरी, अर्चना भोंगाडे, सुषमा काकने, शुभांगी भुजाडे,मिना ठाकरे, नलिनी अमझरे, कविता पवार,शारदा गांजरे,रूपाली अढाऊ, उषा चव्हाण, रेणुका चव्हाण,राणी चव्हाण, मुक्ता धोटे, प्रियंका देशमुख,मोहीनी भिलपवार,काजल पवार, चित्रा हरणे,पुजा पवार, संगिता भोजने, चेतना पिढेकर, निता आकोटकर,ममता डोळे, मंगला धुळे,सुषमा देशमुख,देबोशी विश्वास, शालीनी शेलोटे,सुषमा पालीवाल, नंदिनी पालीवाल,प्रतिक्षा काकडे,छकुली भुजाडे, गायत्री भोंगाडे, श्रध्दा कुरळकर, गुंजन कुरळकर व परिसरातील समस्त महिला भगिनींनी मोलाचं सहकार्य केले

श्री तुळजाभवानी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष व व्यवस्थापक पंडित अण्णाशास्त्री चव्हाण यांनी सर्वांचे आभार मानले.

# राख वाहून नेणाऱ्या वाहनांवर आरटीओची कार्यवाही

## अकरा वाहनांना ठोठावला सहा लाखांचा दंड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि१५अमरावती**

रतन इंडिया औष्णिक उर्जा वीज प्रकल्पातून राखेची वाहतूक करणारे वाहनाची आरटीओ विभागाकडून तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणा:या ११ वाहनांना ६ लाख १० हजाराचा दंड प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून ठोठाविण्यात आला.गेल्या दोन दिवसापासून विशेष तपासणी मोहीम अंतर्गत रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पातून निघणाऱ्या प्रत्येक वाहनाची तपासणी करण्यात आली. यामध्ये राखेची वाहतूक करणारे अकरा बलकर वाहनावर मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमान्वये कार्यवाही करण्यात येऊन त्यांच्याकडून सहा लाख दहा हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.



प्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीमती उर्मिला पवार, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत देशमुख यांच्या मार्गदर्शनात मोटार वाहन निरीक्षक प्रताप राऊत, प्रमोद सरोदे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक शिवप्रसाद मवाळ, राहुल मुंडे, कृष्णा नेवरे, वाहन चालक मोहम्मद अतहर, रितेश मेश्राम व अमोल गावंडे यांनी ही कार्यवाही केली.

# उद्यापासून आ.सुलभाताई खोडके यांच्या जनआशीर्वाद यात्रेला सुरुवात

## महिनाभर घरोघरी जाऊन साधणार जनतेशी थेट संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

अमरावती विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने आ.सौ.सुलभाताई संजय खोडके यांच्या झंझावती जनआशीर्वाद यात्रेला सुरवात होणार आहे. बुधवार दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ पासून सायंकाळी ५.३० वाजता जवाहर नगर त्रिमूर्ती भक्तिधाम मंदिर येथून आ.सौ. सुलभाताई खोडके यांच्या जनआशीर्वाद यात्रेला सुरुवात होणार असून नवसारी भाग, जवाहर नगर, रेखा कॉलनी, निशिगंधा कॉलनी, अरुण कॉलनी, कौशिक विहार, कल्पना नगर, सुशांत कॉलनी, आदी भागात पदयात्रा करण्यात येईल. या दरम्यान आमदार सौ. सुलभाताई खोडके या नागरिकांच्या घरी भेटी देणार असून त्यांच्याशी संवाद साधून आशीर्वाद घेणार आहे. मागील पाच वर्षापासून आ.सौ. सुलभाताई खोडके या अमरावती विधानसभा मतदार संघाच्या लोकप्रतिनिधी असून त्यांच्या कार्यकाळात झालेल्या विकास कामांची माहिती सुद्धा स्थानिक नागरिकांना देण्यात येणार आहे. तसेच आगामी विकासाचे व्हिजन तयार करून नियोजित कृती कार्यक्रमाविषयी सुद्धा नागरिकांना माहिती देण्यात येईल. १६ ऑक्टोबर पासून सुरु होणारी आ.सौ.सुलभाताई खोडके यांची जनआशीर्वाद यात्रा येत्या महिनाभर चालणार असून थेट –भेट थेट संवाद, व डोअर टू डोअर दौरा करून नागरिकांच्या भेटीगाठी व आशीर्वाद घेणार आहे.



अमरावती विधानसभा निवडणुकीत आपण सर्वांची साथ , विश्वास व आशीर्वाद लाभावे, यासाठी जनआशीर्वाद यात्रेच्या माध्यमातून आ.सौ. सुलभाताई खोडके जनतेच्या भेटीला येत आहे. यामध्ये जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी केले आहे.

# प्रविण पोटे पाटील यांच्या निधी अंतर्गत ३ कोटी ७५ लक्ष रुपयांचे विकास कामे

## शेगाव रहाटगाव प्रभागातील विकास कामांचे लोकार्पण नागरिकांनी मानले प्रविण पोटे पाटील यांचे जाहीर आभार




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती**

भाजपा अमरावती जिल्हा शहर अध्यक्ष आ. प्रविण पोटे पाटील यांच्या निधी अंतर्गत शेगाव– रहाटगाव प्रभागातील ३ कोटी ७५ लक्ष रुपयांचे विकास कामे संपन्न झाले असून २५० पेक्षा जास्त कामे पूर्णत्वास गेली आहे. याची पोच पावती म्हणून शेगाव रहाटगाव परिसरातील नागरिकांनी आ.प्रविण पोटे पाटील यांचा सत्कार व जाहीर आभार सोहळा आयोजित केला. या जाहीर आभार सोहळ्याला माननीय श्रेयशदादा पोटे पाटील प्रामुख्याने उपस्थित होते.आ. प्रविण पोटे पाटील यांनी नेहमी शहरातील जनतेच्या समस्या , मागण्या ऐकून त्या पूर्णत्वास नेल्यात, नागरिकांना आवश्यक असणाऱ्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्या निधी अंतर्गत विविध विकास कामे केली यात प्रामुख्याने रस्ता काँक्रीटीकरण, रस्ते डांबरीकरण, नाली बांधकाम, उद्याने नुतनीकरण, पेव्हींग ब्लॉक, समाज मंदिर ज्येष्ठ नागरिक साठी बसण्यासाठी निवारा, नाला खोलीकरण यांचा समावेश आहे. प्रविण पोटे पाटील यांनी जातीने लक्ष घालून सर्व कामे जनतेच्या मनाप्रमाणे पूर्ण केली.

शेगाव रहाटगाव परिसरात भेडसावणाऱ्या समस्येचे तत्काळ निवारण करून विकास कामे केल्याबद्दल नागरिकांच्या वतीने प्रविण पोटे पाटील यांचे या सोहळ्याच्या निमित्ताने जाहीर आभार मानले .यावेळी चेतन पवार, प्रकाश पुंड, धीरज बारबुद्धे, धनराज चक्रे, , अभिजित वानखडे, सौ. वंदनाताई मडगे, डॉ. अनुभूती पाटील, खडसे काका, अंबादास तायडे, नरेंद्र भेंडे व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# तिवसा तालुक्यातील संत्रा,मोसंबी, कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याच्या विविध मागणीसाठी आंदोलन

## शेतकऱ्यांचे तिवसा तहसीलदारांना निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५तिवसा**

तिवसा तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकऱ्याचे सततच्या पावसामुळे मोठया प्रमाणात गळती झालेली आहे.संत्रा गळती इतक्या प्रमाणात होती की अक्षराशः शेतात संत्राचा सळा पडलेला होता.त्यामुळे कृषी विभागाने संत्रा व मोसंबी च्या शेतात जाऊन नुकसानीचे पंचनामे केलेले आहे.पण एक महिना उलटून गेल्यानंतरही तिवसा तालुक्यातील संत्रा व मोसम्बी उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळालेली नाही. अमरावती जिल्ह्यातील काही तालुक्यामध्ये संत्रा नुकसान भरपाईची लिस्ट ग्रामपंचायत स्तरावर लागलेली आहे.फक्त तिवसा तालुका मधेच नुकसान भरपाईची लिस्ट लागली नसल्याने शेतकरी याही वर्षी नुकसान भरपाई विना राहील की काय असी शंका आता शेतकरी करीत आहे.जे शेतकरी संत्रा किंवा मोसम्बी एकाच पिकावर अवलंबून आहे ते शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहे.म्हणून शासनाने तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांना सरसकट संत्रा,मोसम्बी उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख हजार रुपयाची आर्थिक मदत तातडीने देण्यात यावी.तसेच जून महिन्यात मोझरी,गुरुदेव नगर व तळेगाव ठाकुर येथील शेतकऱ्याचे वादळी वऱ्यांसाह मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले होते त्यांचे पण पंचनामाचे आदेश तहसीलदार यांच्या वतीने देण्यात आले होते. त्यांची पण भरपाई चार महिने उलटून सुद्धा मिळालेली नाही ती सुद्धा तातडीने द्यावी.तसेच मागील वर्षी सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी म्हणजे २०२३ मध्ये शेतकऱ्यांनी एक रुपयामध्ये पीक विमा काढलेला होता त्या विम्याच्या परतावा आताही पर्यंत मिळालेला नाही म्हणून मागील वर्षी म्हणजे २०२३ आणि २०२४ चा पीक विमा तातडीने शेतकऱ्यांना द्यावा अन्यथा युवक काँगेस व शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलनचा इशारा देण्या आला आहे.

# चारचाकी वाहनांच्या टोलमुक्तीसाठी महाविकास आघाडीचा रास्तारोको

## टोल नाक्यावर थांबविली वाहने, कार्यकर्त्यांची निदर्शने : महाविकास आघाडीचे राजमार्ग प्राधिकरण यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नांदगाव पेठ**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुंबईमधील पाच टोल नाक्यावर चारचाकी वाहनांना टोल मुक्त करण्याचा निर्णय घेतला आणि आजपासून तो अंमलात देखील आणला मात्र याच धर्तीवर मुंबईच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील टोल नाक्यावरून तसेच नांदगाव पेठ येथील आयआरबीच्या टोल नाक्यावरून चारचाकी वाहनांना टोलमुक्त करा या मागणीसाठी महाविकास आघाडीने नांदगाव पेठ येथील टोलनाक्यावर रस्ता रोको आंदोलन केले. यावेळी टोल नाक्यावर वाहने देखील अडविण्यात आली होती. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी एकतर्फी निर्णय घेणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व महायुती सरकारचा यावेळी निषेध केला. नांदगाव पेठ येथील टोल नाक्यावरून देखील हजारो शेतकरी, व नागरिकांची चारचाकी वाहने जातात. एकीकडे महागाई आकाशाला भिडली असतांना एका गावातुन दुसऱ्या गावात जातांना दोनशे रुपयांचा फटका नाहक नागरिकांना बसतो आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेला हा निर्णय केवळ मुंबईपुरताच का असा सवाल सुद्धा आंदोलकांनी उपस्थित केला आहे. मुंबई प्रमाणे महाराष्ट्रातील सर्वच टोल नाक्यावर व नांदगाव पेठ येथील टोल नाक्यावर चारचाकी वाहनांना टोल मुक्त करा, त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचेशुल्क आकारण्यात येऊ नये अश्या आशयाचे निवेदन महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांना दिले आहे. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी टोल नाक्यावरील वाहने अडवून यावेळी प्रचंड घोषणाबाजी केली, सरकार विरोधात तीव्र निदर्शने करत संपूर्ण राज्यातील वाहनांना टोलमुक्त करण्याच्या घोषणा दिल्या. येत्या दोन दिवसात नांदगाव पेठ येथील टोल चारचाकी वाहनांना मुक्त केला नाही तर महाविकास आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देखील देण्यात आला.यावेळी टोल नाक्यावर महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी आंदोलनात्मक भूमिका घेतल्याने नांदगाव पेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांनी तातडीने आंदोलनस्थळ गाठून आंदोलकांशी चर्चा केली व वाहतूक सुरळीत केली. यावेळी महाविकास आघाडीचे प्रा. मोरेश्वर इंगळे, संजय चौधरी, दिलीप चौधरी, बाळासाहेब देशमुख, नितीन हटवार,अरुण राऊत, राजेश बोडखे, अमित गावंडे, पंकज शेंडे, चंदू राऊत,विनोद डांगे, शशी बैस,शेख तौसिफ,आनंद लोहोटे, नितीन वैष्णव, ओम राऊत,मो. नसीम खान, बाळासाहेब राऊत, अनिल कीर्तकार,संजय नागोणे, ज्ञानेश्वर बारस्कर यांसह शेकडो पदाधिकारीव कार्यकर्ते उपस्थित होते.



# रतन टाटांचा देशकार्यात खूप मोठा वाटा – संदीपपाल महाराज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५दर्यापूर**

लाखो लोकांना मजुरांना रोजगार देणारे टाटा सारखा माणूस पुन्हा या भूतलावर होणार नाही, टाटा म्हणजे महाराष्ट्रतला एक देव माणूस म्हटलं तरी काही वावगे ठरणार नाही . रतन टाटांचा देशकार्यात खूप मोठा वाटा आहे असे प्रतिपादन समाज प्रबोधनकार संदीप पाल महाराजांनी सामदा काशीपूर येथे केले. ऋषी महर्षी वाल्मीकी दुर्गोत्सव मंडळ सामदा काशीपूर च्या वतीने आयोजित समाजप्रबोधनकार सत्यपाल महाराजांचे शिष्य संदीपपाल महाराजांचा समाजप्रबोधन पर किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. गावकरी मंडळी च्या वतीने सौ. योगीताताई विजय चौरपगार सरपंच , सौ छाया दिपक रायबोले उपसरपंच ,ऋषी महर्षी वाल्मिकी नवदुर्गा मंडळ अध्यक्ष गजानन तुळशीराम भगत, उपाध्यक्ष गोपाल नारायण खेडकर , सुभाष नामदेव राणे मंडल अधिकारी रत्नागिरी,सचिव गजानन जुंबळे, अंकुश किरडे , किरण बलदेवराव आढे सदस्य ग्रा पं सामदा काशिपुर , शाम रुपराव नवलकार यांनी संदीप पाल महाराजांचा छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा ,गुरुवर्य ऋषी घुसरकर महाराज, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमामध्ये चार बांधवांनी दारु सोडण्याचा संकल्प केला .त्यावेळी संदीप पाल महाराजांच्या हस्ते प्रकाश नारायण किरडे, विकास नागोराव घाटे, पुजाजी पुर्णाजी ढगे , निरंजन पांडुरंग चावरे यांचा उभयंता सह शाल श्रीफळ साडी देउन सत्कार केला .निसर्गवासी रतन टाटांना सामुहिक श्रध्दांजली वाहण्यात आली व राष्ट्रवंदना ने कार्यक्रमाची सांगता झाली.

# विभागीय लोकशाही दिनात १२ प्रकरणांवर सुनावणी

## प्रकरणांचा तत्काळ निपटारा होण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावे – उपायुक्त गजेंद्र बावणे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती,**

नागरिकांकडून प्राप्त अर्जावर विहित कालमर्यादेत कार्यवाही होणे आवश्यक आहे. विभागीय लोकशाही दिनाकरिता दाखल प्रकरणांचा संबंधित विभागाकडून वेळेत अहवाल प्राप्त करुन प्रकरणांचा तत्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांनी सर्वंकष प्रयत्न करावे. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित तक्रारदारांना लेखी पत्राव्दारे कळविण्यात यावे, असे निर्देश उपायुक्त गजेंद्र बावणे यांनी आज दिले.

यावेळी लोकशाही दिनात दाखल एकूण १२ प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या.



विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात उपायुक्त श्री. बावणे यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही दिनाचे कामकाज पार पडले. याप्रसंगी ते बोलत होते.

समाजकल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त सुनील वार, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे यांच्यासह पोलीस, महापालिका, महसूल, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. सामान्य प्रशासन विभागाव्दारे सादर करण्यात आलेल्या ५ स्वीकृत अर्ज (प्रलंबित प्रकरणे) व ७ अस्वीकृत अर्ज (सामान्य तक्रार अर्ज) अशा एकूण १२ अर्जावर सविस्तर चर्चा आजच्या विभागीय लोकशाही दिनात झाली. तसेच आजच्या विभागीय लोकशाही दिनात तीन नवीन प्रकरणे दाखल झालीत.

यावेळी उपस्थित तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. प्रलंबित प्रकरणांचा तत्काळ निपटारा करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश उपायुक्त श्री. बावणे यांनी संबंधित विभागांना यावेळी दिले.

# सय्यद राजीक सय्यद गफार जिल्हा काँग्रेस कमिटी संघटन सचिव पदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती**

सय्यद राजीक. सय्यद गफ्फार सेवानिवृत्त शिक्षण अधिकारी योजना अमरावती यांनी आ. यशोमती ताई ठाकूर यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय काँग्रेसचे प्रदेश प्रभारी चेन्नेथीला महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आ. नानासाहेब पटोले, विधानपरिषद पक्षनेता बाळासाहेब थोरात, विधानसभा विरोधी पक्षनेता विजय वडेट्टीवार साहेब, जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, सुनील देशमुख, खा. बळवंत वानखडे यांच्या उपस्थिती काँग्रेस भवन येथे आयोजित जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्ता मेळावा मध्ये प्रवेश घेतला होता. सय्यद राजकीय गफार यांचे सर्व पदाधिकारी यांनी अभिनंदन केले नियुक्ती बद्दल सय्यद राजीक यांनी यशोमती ठाकूर व बबलू भाऊ देशमुख यांची आभार मानले.